# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १५८ वा बुधवार दि.०४ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## शेतातील शेडवर छापा; २ लाखांचा गुटख्या जप्त

लातूर: सुगंधित तंबाखू, गुटख्याचा साठा करुन ठवेलेल्या शेडवर दहशतवादविरोधी शाखेच्या पथकाने छापा मारला. यावेळी जवळपास दोन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलिसांनी खरोळा (ता. रेणापूर) शिवारात मंगळवारी केली. याबाबत रेणापूर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

पोलिसांनी सांगितले, पांढरी (ता. रेणापूर) गावातील दोघांनी खरोळा शिवारात शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सुगंधित पानमसाला, गुटखा आणि तंबाखूचा साठा विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवल्याची माहिती खबऱ्याने लातूर येथील दहशतवाद विरोधी शाखेच्या पथकाला दिली. या माहितीची खातरजमा केल्यानंतर पथकाने अचानकपणे शेतातील शेडवर छापा मारला.

या छाप्यात सुगंधित पानमसाला, तंबाखू आणि महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटख्याचा साठा असा एकूण २ लाख ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यावेळी बालाजी गणपती ढोंबरे (वय ६५ रा. पांढरी ता. रेणापूर) यास ताब्यात घेत अधिक चौकशी केली असता, हा साठा विक्री करण्यासाठी मी आणि मुलगा नागनाथ ढोंबरे यांनी करुन ठेवल्याची कबुली दिली. घटनास्थळाचा पथकाकडून पंचनामा करण्यात आला आहे. याबाबत दहशतवादविरोधी शाखेतील सहायक पोलिस उपनिरीक्षक अंगद कोतवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन रेणापूर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ही कारवाई परिविक्षाधीन पोलिस उपाधीक्षक राजश्री तेरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक आयुब शेख, सहायक पोलिस उपनिरीक्षक अंगद कोतवाड, सहायक फौजदार जाधव, पोलिस हवालदार शेख, गुंडरे यांच्या पथकाने केली.

## ईव्हीएममधील फेरफार पुराव्यानिशी सिद्ध करू : उत्तम जानकरांचा इशारा

सोलापूर : ईव्हीएमवर झालेल्या मतदानावर शंका उपस्थित करत मारकडवाडीत आज मंगळवारी (ता. ०३ डिसेंबर) फेरनिवडणूक घेण्यात येणार होती. परंतु, प्रशासनाच्या दबावानंतर ही निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माळशिरस विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार उत्तम जानकर यांच्या नेतृत्वात मारकडवाडी गावातील ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर फेरनिवडणूक घेण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, पोलिस प्रशासनाकडून हे मतदान वजा आंदोलन हाणून पाडण्यात आले आहे. ज्यामुळे आमदार जानकरांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत.



ईव्हीएमबाबत आरोप करत आमदार उत्तम जानकर म्हणाले की, मतदान प्रक्रियेत प्रशासन आणि पोलिसांनी खोडा घातला आहे. लोकशाही मार्गाने गावकरी त्यांचा मतदानाचा हक्क बजावत होते. मंडपात मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. त्यांना मतदानाचा हक्क बजावायचा होता. पण पोलिसांनी गुन्हे दाखल करण्याची धमकी दिल्याने अनेक गावकरी मंडपातून बाहेर पडल्याचे त्यांनी सांगितले. वयोवृद्ध आणि महिला मंडप सोडून गेले, असे जानकरांकडून सांगण्यात आले. तसेच, ईव्हीएमच्या व्हीव्हीपॅटमध्ये तुतारीचे मत भाजपाकडे वळत असल्याचा दावाही उत्तम जानकर यांनी केला.

भाजपाला एक मत मिळाल्यानंतर त्याची दोन मते होत असल्याचा गंभीर आरोप जानकरांनी केल्यामुळे खळबळ उडाली आहे.

आमदार उत्तम जानकर यांनी मारकडवाडीत घडलेल्या सर्व प्रकारावरून आता प्रशासनाला इशारा दिला आहे. ईव्हीएममध्ये झालेला घोळ हा आपण पुराव्यानिशी सिद्ध करू. येत्या १५ दिवसांमध्ये १०० टक्के हा घोळ सिद्ध करण्यात येईल, असा इशाराच जानकरांकडून देण्यात आला आहे. तर, माझ्या अभ्यासानुसार मला या गावात १४०० आणि समोरच्याला ५०२ इतकी मतं पडली. पण निकालावेळी समोरच्या उमेदवाराला मारकडवाडीतून १००३ मतं पडल्याचे समोर आले. समोरच्या उमेदवाराला दुप्पट मतदान झाले, असा आरोपही जानकर यांनी केला.

## आंबेडकरी साहित्यिकांना आव्हान कवी लेखक : मधुकर मोहिते.

नवी मुंबई / के. एच. हनवते:- फुले-शाहू-आंबेडकर साहित्य परिषद नवी मुंबई च्या वतीने पहीलाच कार्यक्रम सानपाडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन येथे २६ नोव्हेंबर संविधान दिनाचे ७५ वा आमृत महोत्सवी वर्षांत, फुले-शाहू-आंबेडकर साहित्य परिषद नवी मुंबई लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात अला, त्यावेळी या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक : प्रा. विजय मोहिते सर (पाली भाषा मुंबई विद्यापीठ), तसेच साहित्यिक राजु रोठे सर यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यावेळी या कार्यक्रमात जेष्ठ कवी - लेखक : मधुकर मोहिते यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांनी आपल्या समाज बांधवांना समाजकार्य करण्यासाठी आनेक मार्ग मोकळे करून दिले, धम्मकारण करणारे संघटन, राजकीय क्षेत्रातही संघटन दिले. महामानवाला त्या करिता अपार कष्ट पडले. याचं वाचन केल्यावर आपणास कल्पना येते की. त्यांना भारतरत्न, विश्वरत्न, कोलंबिया महाविद्यालयाने त्यांना दिलेली सिम्बॉल ऑफ नॉलेज पदवी अशा जागतिक कीर्तीच्या महान पदव्या बाबासाहेबांना मिळाल्यात अशा या महापुरुषाने स्थापन केलेल्या संस्था त्या कमीच वाटाव्यात की काय म्हणून आमच्या समाजातील सुपर माईंडेडानी त्या संस्थाचा स्वीकार न करता इतर संस्था-संघटनांची बाबासाहेबांच्या नावाने निर्मिती केली. एकंदरीत बाबासाहेबांच्या आंबेडकरी संघटना अपुऱ्या होत्या त्या आम्ही विद्वानांनी पूर्ण केल्या किंवा त्यात भर टाकली. असं वाटते की काय यांना ? व्वा रे तुमची विद्वत्ता, हजारो वर्षांनंतर मिळालेलं स्वातंत्र्य गमवायची वेळ आपल्यावर येऊ नये. एकाला स्वातंत्र्य आणि दुसऱ्यांना गुलामी अशी स्थिती येऊ नये म्हणून



समता, स्वातंत्र्य, बंधूत्व व सामाजिक न्याय ही तत्वे संविधानात मांडलेली आहेत तसेच डॉ. बाबासाहेबांनी शिका एर्वीलरींश, संघटित व्हा जीसरपळ्श, संघर्ष करा षळसहीं षी ळपर्क्षीीळलश, म्हटले तर या वाक्याचा शब्दच्छल करून सांगणारा दुसरा एक वर्गप्रवाह म्हणतो की, शिक्षित करा -एर्वीलरींश आंदोलन करा- -सळींरींश संघटित रहा.-ीसरपळ्श. या प्रकारे लोकांना जागृत करणारांचे ठायी ठायी असणारे मतभेदांचे विचारप्रवाहानी चळवळ खिळखिळी झाली आहे. हे सुद्धा कारण असू शकते. विचार करा. हे गृहीतक विरोधाभाषी असून चळवळ एकसंघ न होण्यास पुरेसं आहे. असं म्हटलं तर वावगं होणार नाही. या आपल्यातील लोकांनी शब्दच्छल नको करायला, त्यापेक्षा आंबेडकर चळवळ मजबूत करावी यासाठी प्रयास केले पाहिजेत. ठिकठिकाणी असलेल्या चळवळ चालविणारांच्या वेगळ्या शाखा / टोळ्या मोडीत काढाव्यात आणि समाज एकछत्री करण्याचा प्रयास करावा यासाठी आपली विद्वता कामी लावावी. बाबासाहेबांच्या लेखणीला प्रतिसाद न देणारी प्रवृत्ती सर्वनाशास कारणीभूत ठरू शकते. तशी ती दुर्लक्षित झाली तर सांगा विद्वानांनो... आपल्या साहित्याच्या काय असतील कथा ? साहित्यिकांचे साहित्य हे लोकांच्या हिताचे असावं लागतं. नुकतेच राजकारणात दिसून आले. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत आंबेडकरी विचार अदृश्य झाला. आता मुंबई महापालिका निवडणूका येतील त्यात तो दृष्टीस पडावा. ही अपेक्षा प्रत्येक अनुयायाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याले ते वाक्य इथे अधोरेखित करावेसे वाटते. ते वाक्य असं कि जो इतिहास विसरतो तो इतिहास निर्माण करू शकत नाही..! मात्र तेव्हापासून इतिहासावर बोलणारे समाजात खूपच झाले. साहित्यिक, इतिहासकार, इत्यादी पण त्याने इतिहास निर्माण होतोय असे आजचे चित्र नाही. इतिहास निर्माण व्हावा याकरिता वर्तमानाकडे पाहिले पाहिजे. आणि आपले वर्तमान कसे तर एक ना धड भाराभर चिंध्या, या म्हणी प्रमाणे असेल नव्हे ते आहेच. तर इतिहास निर्मितीची आशा फोल ठरते. आंबेडकरी समाजात भरपूर संघटना आहेत त्याला संघटित व्हा या शब्दाने बाबांच्या वाक्याला पुष्टी मिळाली का ? तर नाही. त्या सर्व संघटनानी एकजुटीने राहिले पाहिजे. तेही एकाच निशाणाखाली. तर यश प्राप्ती मिळू शकेल. जोवर हे कार्य अपूर्ण राहील तोवर आम्ही कुठेच इतिहास घडवू शकणार नाही. ह्या वाटचालीत आंबेडकरी साहित्यकावर फार मोठी नैतिक जवाबदारी येते. ह्या अशा तऱ्हेने चळवळीची झालेली दुर्देशा त्यांना/आम्हाला पाहवते तरी कशी ? चळवळीबद्दल लिहून तिला योग्य मार्गाने जाण्यासाठी सातत्य राखावे लागेल. एनकेन प्रकारेन सर्व क्षेत्रे ऐक्यवादी असावीत याचे मार्गदर्शन आता आमच्यातील आंबेडकरी साहित्यिकांवरच आहे. त्यांनी कोणावरही टिकाटिप्पनी टाळून, मान सन्मानाची अपेक्षा न बाळगता आरंभिलेल्या आपल्या साहित्याबरोबरच अग्रक्रम या एकजुटीस द्यावा ही एकमेव नम्र सूचना आहे.

समाज जागृतीचा विस्तव सतत तेवत राहो..! ही प्रार्थना या कार्यक्रमाचे अध्यक्ष : चंद्रकांत दादा जगताप, फुले-शाहू-आंबेडकर साहित्य परिषद नवी मुंबई उपाध्यक्ष : उत्तमराव तरकसे, कार्याध्यक्ष राजेंद्र बनसोडे, सचिव : कल्याणराव हनवते, ज. सेक्रेटरी: वसंत वाघमारे, राजेंद्र वाघमारे, प्रसिद्धी प्रमुख : विशाल टोणगे, कवी : दाजी बिडकर इत्यादी लहान थोर बालक बालीका व अधिक संख्येत महीलांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## महाराष्ट्रात भाजपा महायुतीला अभूतपूर्व यश मिळाल्याबद्दल देवेंद्र फडवणीस यांचा सत्कार

लातूर :-महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपा महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल देवेंद्र फडणवीस यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी विवेक बाजपाई, सुनील होनराव भाजपा माजी अध्यक्ष, यशवंत भोसले माजी चेअरमन संजय गांधी निराधार, संजय घेवले, अभय खुरसाले आदी.




## जन संपर्कातून, ग्राम विकास

नवी मुंबई / के. एच. हनवते:- दत्तक ग्राम वाकडी गाव येथे दिनांक. २५ ते १ डिसेंबर २०२४ दरम्यान भारती विद्यापीठ परिचारिका महाविद्यालय नवी मुंबईच्या, रा. से. यो विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित उद्घाटन प्रसंगी या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. रेश्मा कुरूप रोट्री क्लब संचालक उपस्थित होत्या . त्याच बरोबर अविनाश म्हेत्रे रा. से. योजनेचे कार्यक्रम समन्वयक भारती विद्यापीठ अभिमत विश्व विद्यापीठ पुणे यांच्या मार्गर्शनाखाली करण्यात आले. मा. विनायक शिंदे शंतीवनचे संचालक, सौ.कुंदा पवार वाकडी गाव सरपंच देखील उपसथित होते.या शिबिरामध्ये रा. से. योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबवण्यात आले, त्यामध्ये प्रामुख्याने प्रभातफेरी (सामाजिक समस्या), आरोग्य प्रचार, श्रमदान, पथनाट्य, आरोग्य तपासणी आणि दात तपासणी, हळदी कुंकू समारंभ यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता सदर कार्यक्रम भारती विद्यापीठ परिचारिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैशाली जाधव व सदर कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक वैभवकुमार पोवार रा. से. यो कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक. डॉ. गार्गी कराडकर, प्राध्यापिका. देविका, प्राध्यापिका अकंक्षा अमोलीक, प्राध्यापिका. रोहिणी पाटील व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. आनंद शिंदे यांनी सदर कार्यक्रमात उस्फुर्तपणे सहभाग घेतला तसेच रा. से. यो. चे विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन केले व हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण होण्यास मदत केली. ह्या सामाजिक कमाबदल डॉ. वैशाली जाधव आणि वैभव पोवार यांना कुष्ठरोग निवारण समिती कडून डॉ. शिंदे यांच्याकडून राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले.




## अबबसन २०२१ पासून तब्बल आठव्यांदा चावला महिलेला साप

महाराजगंज : उत्तर प्रदेशच्या महाराजगंजमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. सुमित्रा यादव या ३५ वर्षीय महिलेला रविवारी एकदा, दोनदा नव्हे तर आठव्यांदा साप चावला. दरवेळीप्रमाणे यावेळीही कुटुंबीयांनी महिलेला सामुदायिक आरोग्य केंद्र निचलौल येथे दाखल केले, तेथे तिच्यावर उपचार सुरू आहेत. या विचित्र घटनेने आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थांना मोठा धक्का बसला आहे. एकाच महिलेला वारंवार साप चावल्याची घटना गावात चर्चेचा विषय बनली आहे. सुमित्रा यादव सांगतात की, त्यांचे पती गोविंद यादव हे काम करण्यासाठी परदेशात राहतात आणि त्या आपल्या घरातील कामात व्यस्त असतात. रविवारीही त्या घरातील कामात मग्न असताना अचानक एक साप उजव्या हाताला चावला. या घटनेनंतर तिला तातडीने सामुदायिक आरोग्य केंद्र, निचलौल येथे आणण्यात आले, तेथे उपचार सुरू आहेत. पहिल्यांदा घडलेले नाही. याआधीही सात वेळा साप चावला होता. महिलेने असेही सांगितले की २०२१ पासून सतत ही घटना तिच्यासोबत घडत आहे. यावेळी सर्पदंशाच्या घटनेनंतर इमर्जन्सी ड्यूटीवर तैनात असलेले आरोग्य कर्मचारीही आश्चर्यचकित झाले, कारण एकाच महिलेला पुन्हा पुन्हा



साप चावण्याची ही परिस्थिती अत्यंत दुर्मिळ आणि असामान्य आहे. महिलेच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून आता ती पूर्णपणे बरी होत आहे. एकाच महिलेला साप पुन्हा पुन्हा कसा चावतो, याचं गावक-यांना आश्चर्य वाटते. काही लोक याला दुर्मिळ घटना मानत आहेत. एकाच व्यक्तीला वारंवार चावा घेणं खरोखरच असामान्य आहे. ही घटना महाराजगंज जिल्ह्यात आश्चर्याची तर ठरली आहेच, पण या घटनांमागे काही विशिष्ट कारण आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## संपादकीय....

### आरोग्य, शिक्षण व कौशल्य क्षेत्रात गुंतवणूक गरजेची

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते युनिसेफच्या 'स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन रिपोर्ट – २०२४ : बदलत्या विश्वात लहान मुलांचे भवितव्य' या विषयावरील अहवालाचे प्रकाशन राजभवन, मुंबई येथे करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले की, भारतात सन २०५० पर्यंत लहान मुलांची संख्या जगात सर्वाधिक, म्हणजे अंदाजे ३५ कोटी असेल. यादृष्टीने राज्यांनी आरोग्य सेवा, शिक्षण व कौशल्य प्रशिक्षण, नोकरीच्या समन्यायी संधी निर्माण करणे व तंत्रज्ञान उपलब्धतेतील तफावत कमी करणे गरजेचे असून या क्षेत्रात अधिक गुंतवणूकीवर भर द्यावा,

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन म्हणाले की, महाराष्ट्रासह आसाम, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि इतर काही राज्यांना पर्यावरण विषयक आव्हानांना सामोरे जावे लागेल. पर्यावरणीय बदल तसेच जैवविविधता आणि नैसर्गिक संसाधनांच्या ऱ्हासाची झळ विशेषतः लहान मुलांना बसेल, असे 'युनिसेफ'च्या अहवालात म्हटले आहे.

पर्यावरण बदलांना तोंड देताना युवा पर्यावरण योद्धे व समाजातील विविध घटकांची भूमिका महत्वाची आहे असे सागून राज्यपालांनी महाराष्ट्र युथ फॉर क्लायमेट ऍक्शन आणि ग्रीन क्लब या पर्यावरण उपक्रमांना तसेच पर्यावरण योद्ध्यांच्या कामाचे विशेष कौतुक केले. यावेळी युनिसेफ महाराष्ट्रचे मुख्य अधिकारी संजय सिंह यांनी राज्यातील विद्यापीठांमध्ये पर्यावरण विषयक अभ्यासक्रम राबविण्याची विनंती केली.विद्यापिठांमध्ये लवकरच पर्यावरण विषयक अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल असे राज्यपालांनी सांगितले. महाविद्यालयीन पर्यावरण योद्धे गुरप्रीत कौर आणि पूजा विश्वकर्मा यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

'द स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन २०२४' अहवालामधील निष्कर्ष हे भारतासाठी महत्त्वपूर्ण आहेत कारण असा अंदाज आहे की एकूण जागतिक बालसंख्येपैकी १५ टक्के मुले भारतात असतील.

बालहक्कांच्या बाबतीत भारताने नक्कीच लक्षणीय प्रगती केली आहे. या मार्गावर पुढे जाण्यासाठी, आपण आरोग्य, दर्जेदार शिक्षण, कौशल्ये आणि नोकरीच्या संधींमध्ये शाश्वत बाल–केंद्रित गुंतवणूकीच्या माध्यमातून आव्हानांचा सामना केला पाहिजे. प्रत्येक मुलाला तंत्रज्ञानाचा समान प्रवेश मिळावा यासाठी डिजिटल डिव्हाईड कमी करणे आवश्यक आहे. येत्या काही दशकांमध्ये भारतातील जवळपास निम्मी लोकसंख्या शहरी भागात राहण्याचा अंदाज आहे. यासाठी बालस्नेही शाश्वत शहरी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करावी लागेल.

या अहवालामध्ये तीन मेगाट्रेंड्सद्वारे उभ्या राहिलेल्या आव्हानांना आणि संधींचा सामना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शहरांतील मुलांसाठी शिक्षण, टिकाऊपणा आणि सेवांमध्ये गुंतवणूक करणे.

पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, आवश्यक सेवा आणि सामाजिक समर्थन प्रणालींमध्ये उत्तम हवामान प्रणाली (उश्रळारींश ठशीळश्रळशपलश ) चा विस्तार करणे.

सर्व मुलांसाठी कनेक्टिव्हिटी आणि सुरक्षित तंत्रज्ञानासाठी ब्लूप्रिंट प्रदान करणे.

यावेळी 'द स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन २०२४' हा अहवाल २० नोव्हेंबर रोजी जागतिक बालदिनाच्या निमित्ताने लॉन्च करण्यात आला आहे. युनिसेफ 'लिसन टू द फ्युचर' च्या माध्यमातून मुलांच्या आणि तरुणांच्या आवाजावर लक्ष केंद्रित करण्याची ही संधी घेते जेणेकरून आपल्या मुलांना हवे असलेले जग आपण निर्माण करू शकू. पण, यासाठी आपल्याला आपल्या मुलांचे ऐकावे लागेल.

# सावधान !भयावह रस्ते अपघात चिंताजनक.

दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण कमी न येता वाढतच आहे. राज्यातील अनेक भागातुन आपल्याला दररोज एक–ना–एक भयावह अपघात झालेला दिसतो.असे अपघात होत आहे की ज्याची आपण कल्पनासुद्धा करू शकत नाही.अशाप्रकारचे अंगावर शहारे येणारे अपघात राज्यात कुठेना कुठे दिसुन येतात हे संपूर्ण अपघात मानवांच्या चुकांमुळे होत आहे.यावर नियंत्रण आणने काळाची गरज आहे.दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ ला सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांना बोर अभयारण्य येथे सहलीला घेऊन जाणारी खाजगी बस हिंगणी रोडवरील पेंढरी घाट परिसरात सकाळी ९.३० च्या सुमारास खायीत कोसळली यात एका विद्यार्थ्यानीचा मृत्यू झाला व अनेक गंभीर जखमी झालेत.याघटनेमुळे पालकांचे अश्रू आवरेना या भयावह दुःखद घटनेमुळे नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्र हळहळला.त्याच दिवशी २६ नोव्हेंबरला कामठी परिसरात वेगात आलेला ऑटो उभ्या क्रेनवर आदळल्याने दोन महिला प्रवासी जागीच ठार झाल्यात तर चालकासह सहा प्रवासी गंभीर जखमी झाले.दिनांक २६ नोव्हेंबरला कामठीतील गरूड चौक परिसरात सकाळी ५ वाजताच्या सुमारास आणखी भयावह घटना घडली भरधाव कार लोखंडी रेलिंगला धडकल्याने रेलिंग कारच्या आरपार घुसून युवकाचा मृत्यू झाला तर दोन अन्य जखमी झालेत.या संपूर्ण घटना ताज्या असतांनाच दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ ला गोंदिया जिल्ह्यातील डव्वाजवळ शिवशाही बस उलटून ११ प्रवासी ठार तर २९ गंभीर प्रवासी गंभीर जखमी झालेत. यावरून स्पष्ट होते की देशात किंवा राज्यात मोठ्या प्रमाणात उडानपुल, सिमेंट रोड, समृद्धी महामार्ग व अत्याधुनिक सुविधा असुनसुद्धा आपल्या डोळ्यासमोर गंभीर अपघात होतांना दिसतात. वाढत्या अपघातांचे मुख्य कारण म्हणजे वाहन चालकांच्या चुका किंवा वाहनांवरील नियंत्रण जाणे किंवा दुसऱ्याला वाचविण्यासाठी चुकीच्या मार्गांचा अवलंब केल्याने दुर्घटना होतांना दिसतात.गोंदियातील अपघात हा सडक अर्जुनी –गोंदिया मार्गावरून शिवशाही जात असतांना खजरी–डव्वा गावाजवळ दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात चालकांचे बसवरील नियंत्रण सुटले व बस उटली आणि मोठा घात झाला.म्हणजेच छोटीशी चूक जीवावर कशी बितते हे या अपघातांचे जिवंत उदाहरण आहे.याचप्रकारे बोर अभयारण्य येथे सहलीला घेऊन जाणारी खाजगी बस पेंढरी घाट परिसरात नागमोडी वळणावर बसचालकाचे नियंत्रण सुटले आणि मोठा घात झाला.हिट न्ड रन, वाहन चालवितांना मोबाईलवर बोलणे, रस्त्याचे खड्डे अशा अनेक कारणांमुळे वाहन चालकांचा जीव धोक्यात येतोच सोबतच पायदळ चालणारे किंवा इतर वाहनचालक किंवा त्या वाहनांमध्ये बसणाऱ्या प्रवाशांचा सुध्दा जीव धोक्यात येऊ शकतो याचे जिवंत उदाहरण आपणा सर्वांसमोर आहेच. खाजगी वाहन चालक आपला वेळ वाचवण्यासाठी किंवा जास्त ट्रीप व्हाव्यात या उद्देशाने वाहन अतिवेगाने चालवितात व अशा चुकांमुळे सुध्दा अपघात होतांना दिसतो.गोंदियातील शिवशाहीच्या अपघातामुळे शिवशाहीवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात (एसटी) सर्वाधिक अपघातांचे प्रमाण हे शिवशाहीचे आहे असे उघडकीस आले आहे.शिवशाही वाईट अवस्थेत असतांनाही महामंडळाकडून वातानुकूलितच्या नावाने सर्वाधिक प्रवासी भाडे आकारले जाते.गोंदिया जिल्ह्यात शिवशाही बसला झालेल्या अपघातामुळे शिवशाही बसच्या वाईट अवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.यावरून स्पष्ट होते की सध्याच्या परिस्थितीत शिवशाही बसचे मेंटेनन्स व्यवस्थीत नसल्याने अत्यंत खराब अवस्थेत असल्यामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहे.राज्यात एसटी महामंडळाच्या ताफ्यात १५ हजार ६०० च्या जवळपास बसेस आहेत.त्यात ८९२ शिवशाही बसेसचा समावेश आहे.करोना काळात प्रवासी सेवा बंद पडल्यानंतर एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती वाईट झाली. तेव्हापासुन सातत्याने महामंडळात बसच्या सुट्या भागांच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे.त्यामुळे अनेक एसटी बसेस अपघातांचे सुध्दा कारण बनत आहे.या संपूर्ण बाबींवर सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.भारतात प्रत्येक तासाला ५३ रस्ते अपघात होतात;त्यात प्रत्येक तासाला १९ लोकांचा मृत्यू होतो असे एका अहवालात नमूद केले आहे. म्हणजे देशात किंवा राज्यात रस्ते अपघात कमी झाले नसुन वाढल्याचे दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे रस्त्याचे खड्डे, रोडचे बांधकाम, वाहनांचे ब्रेक बरोबर नसने,वाहन चालवितांना मोबाईलचा वापर, वाहनांचे मेंटेनन्स वेळोवेळी न करणे,मद्य पीवुन वाहन चालविणे अशा प्रकारच्या अनेक कारणांमुळे भयावह अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.त्यामुळे वाढते भयावह रस्ते अपघात पहाता वाहन चालकांनी वाहनावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.महाराष्ट्रासह देशात होणारे ८५ टक्के अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा चुकांमुळे होत असल्याचे दिसून येते,तर १५ टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतांना दिसतात.एवढे माहीत असूनही वाहन चालक आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते.त्यामुळे कोणतेही वाहन चालवितांना काळजी पूर्वक वाहन चालवावे.कारण थोडीशी चुक मृत्यूचे कारण बनू शकते याला नाकारता येत नाही.त्यामुळे वाहन चालकांनो सावधान!आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवा व स्वतः सुरक्षित रहा व दुसऱ्यांना सुध्दा सुरक्षित ठेवा.जान है तो जहान हैहा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे व अपघात टाळले पाहिजे.

*****

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# कल्याणकारी योजना?



कल्याणकारी राज्य ही संकल्पना बदलत चालली आहे का, असा प्रश्न आपल्यापुढे उभा राहतो. कल्याणकारी योजनांच्या बदलत्या रूपाकडे जनता कशाप्रकारे पाहते आहे हे आजच्या परिस्थितीवरून सहज लक्षात येईल.

महायुतीला एवढे जबरदस्त यश कशामुळे मिळाले याचा वस्तुनिष्ठ उहापोह करणे गरजेचे आहे. काही ठिकाणी या अभूतपूर्व निकालांचे वर्णन 'चमत्कार' असे करण्यात आले. राजकारणासारख्या अतिशय गंभीर क्षेत्रात बुवा––महाराज करत असलेल्या बोगस चमत्कारांना स्थान नसते. राजकारण म्हणजे लोकाभिमुख धोरणं आखणे आणि अशा धोरणांची अंमलबजावणी करणे. नेमकं तेच महायुती सरकारने केलं. ही प्रक्रिया समजून घेणे उद्बोधक ठरेल.

मे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांत महाराष्ट्र राज्यात ज्या महायुतीला फारसे यश मिळाले नव्हते, त्याच महायुतीला अवघ्या सहा महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळाले, याची दखल घ्यावी लागते. असे दिसते की महायुतीने लोकसभा निवडणुकीतील अपयशाचे विश्लेषण केले, त्यांच्या विरोधात जाणार्या एकेक घटकाचा सामना करण्याची रणनीती आखली आणि ती प्रत्यक्षात आणली. यातील महत्त्वाचा उपाय म्हणजे शेतकरीवर्गाची नाराजी दूर केली. यासाठी भावांतर योजनेच्या जोडीने कांदा आणि सोयाबीन शेतकर्यांच्या अडचणी दूर केल्या. यातही सर्वात महत्त्वाची ठरलेली ती म्हणजे 'लाडकी बहीण' योजना.

यासंदर्भात हेही लक्षात ठेवले पाहिजे की पंतप्रधान मोदींनी अशा योजनांची 'रेवडी योजना' म्हणून संभावना केली होती. मात्र, अशीच एक योजना म्हणजे महाराष्ट्र सरकारने जुलैमध्ये जाहीर केलेली 'लाडकी बहीण' योजना. महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये देणारी ही योजना अनेक अर्थाने, अनेक पातळ्यांवर 'गेमचेंजर' ठरली. त्याची चर्चा केली पाहिजे. मुख्य म्हणजे त्याच्यामागे असलेले जागतिक पातळीवरचे राजकीय तत्त्वज्ञान समजून घेतले पाहिजे.

जगाचा इतिहास समजून घेतला तर 'शासन' यंत्रणेच्या जबाबदा–यांत आमूलाग्र बदल झालेले दिसतात. आधुनिक पूर्वकाळात शासनव्यवस्थेची महत्त्वाची आणि कदाचित एकमेव जबाबदारी म्हणजे प्रजेचे रक्षण करणे. अंतर्गत सुरक्षेसाठी 'पोलीस' आणि बाह्यसुरक्षेसाठी 'सैन्य', अशी दोन दलं उभारली जात असत. त्यांच्या पगारासाठी आणि सरकारच्या इतर खर्चासाठी जनतेवर कर लादला जात असे. हा प्रकार अनेक शतकं चालला. काही अभ्यासकांच्या मते, याला एकोणिसाव्या शतकात धक्के बसायला लागले. एवढेच नव्हे तर १९१७ मध्ये रशियात झालेल्या कामगार क्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या सरकारने असंख्य लोकोपयोगी कामं करून, उपक्रम राबवून तसेच नोकरीचा 'मूलभूत हक्क' देऊन फार थोड्या काळात जनतेचं राहणीमान वाढवलं. याची जगभरच्या अभ्यासकांत आणि राजकीय नेत्यांत चर्चा सुरू झाली.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अशा काही घटना घडल्या ज्यामुळे 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना आणखीच चर्चेत आली. यातील एक अतिशय महत्त्वाची घटना म्हणजे १९२९ मध्ये अमेरिकेत आलेली 'महाभयानक मंदी' (ग्रेट डिप्रेशन). ही घटना जरी अमेरिकेत सुरू झाली तरी याचे जागतिक परिणाम दिसायला लागले होते. खासकरून युरोपातील अनेक देशांत अशी मंदी कमी अधिक प्रमाणात जाणवायला लागली. अशा स्थितीत अर्थव्यवस्थेत चैतन्य आणण्याची, बंद पडलेल्या अर्थचक्राला गती देण्याची जबाबदारी शासनव्यवस्थेची आहे, असा विचार पुढे आला. हा विचार हिरीरीने मांडण्यात ब्रिटीश अर्थतज्ज्ञ लॉर्ड किन्स (१८८३ ते १९४६) यांचा पुढाकार होता. त्यांनी १९३३ साली 'द मिन्स टू प्रॉस्पेरीटी' हे पुस्तक लिहिलं. तेव्हा अमेरिकेत काही प्रमाणात युरोपात आर्थिक मंदीने धुमाकूळ घातला होता. हे पुस्तक अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट यांच्यापर्यंत गेले. त्यांनी यातील प्रतिपादनाचा विचार करायला आणि त्यानुसार धोरणं आखायला सुरू केली.

लॉर्ड किन्स यांचं अतिशय महत्त्वाचे पुस्तक 'द जनरल थेअरी ऑफ एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी' १९३६ मध्ये प्रकाशित झाले. हे पुस्तक फार वादग्रस्त ठरलं. यातील प्रतिपादन पारंपरिक अर्थशास्त्रातील सिद्धांतांच्या पूर्ण विरोधात होतं. यातूनच शासनव्यवस्थेच्या जबाबदर्यांत कमालीची वाढ व्हायला सुरुवात झाली. काही अभ्यासकांच्या मते 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेची गंगोत्री म्हणजे हे पुस्तक. यानुसार सरकारने जनतेच्या हातात पैसा ठेवला पाहिजे. लोक हा पैसा बँकेत ठेवणार नाही. या पैशातून ते खरेदी करतील, यामुळे मागणी वाढेल, त्यामुळे मग गुंतवणूक वाढेल आणि यातूनच थंड पडलेल्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल. ही या सिद्धातांची अगदी ढोबळ मांडणी आहे. मात्र मुद्दा समजून घेणे गरजेचे आहे.

भारतात स्वातंत्र्यानंतर अशा अनेक कल्याणकारी योजना जाहीर केलेल्या दिसून येतात. यासाठी आपल्या राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत अनेक कलमे दिली आहेत. कलम ४७ मध्ये असं स्पष्टपणे नमूद केले आहे अशी कलमे आहेत जी सरकारवर लोककल्याणाची जबाबदारी टाकतं. यानुसार पंडित नेहरूंचं सरकार असू दे, इंदिरा गांधींच सरकार असू दे, वाजपेयी सरकार, डॉ. मनमोहन सिंग सरकार आणिआता सत्तेत असलेले मोदी सरकार वगैरे जवळपास सर्व सरकारांनी या ना त्याप्रकारे आणि त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानानुसार लोककल्याणाच्या अनेक योजना आखल्या.

तोचप्रकार महाराष्ट्राच्या पातळीवर एकनाथ शिंदे सरकारने केला. यातून नंतर गेमचेंजर ठरलेली 'लाडकी बहीण' योजना साकार झाली. आता तीच योजना चर्चेत आहे. अशा योजनांबद्दल दक्षिण भारतातील तमीळनाडू वगैरे राज्य एकप्रकारे बदनाम आहे. तिकडच्या विधानसभा निवडणुकांत सत्तेत आलो तर मतदारांना मिक्सर, कूकर, लॅपटॉप फुकट देऊ वगैरे आश्वासनांचा पाऊस पडतो. या योजनांत आणि शिंदे सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेत आमूलाग्र फरक आहे. मिक्सर, लॅपटॉप वगैरेसारख्या गृहपयोगी वस्तू एकदा देऊन टाकणं वेगळं आणि 'लाडकी बहीण' सारख्या योजनांत फार फरक आहे. लाडकी बहीण योजना सध्यातरी कायमस्वरूपी झाली आहे. यापुढे महाराष्ट्रात राज्य करणा–र्या पक्षाला किंवा आघाडीला 'लाडकी बहीण' योजना बंद करताना दहादा विचार करावा लागेल.

लॉर्ड किन्स यांच्या तत्त्वज्ञाना मागचा विचार साधा होता. तो म्हणजे सरकारने येनकेन प्रकारे समाजाची क्रयशक्ती वाढली पाहिजे. भारतीय समाजाच्या दृष्टीने याला आणखी एक वेगळा आयाम आहे. यात महिला सक्षमीकरण गुंतले आहेत. या योजनेमुळे राज्यातील महिलांच्या खात्यात थेट पैसे जमा होऊ लागले आहेत. यामुळे झालेला आणि होत असलेला सामाजिक सांस्कृतिक बदल लक्षात घेतला पाहिजे. 'लाडकी बहीण' योजनेमुळे दर महिन्याला खात्यात पैसे जमा होत असलेल्या महिलांनी महायुतीला भरघोस मतं दिली.

# हास्य आणि रुसवा !

हिवाळी अधिवेशनाचा पहिला आठवडा कोणत्याही कामकाजावाचून संपला आहे. असं असलं तरी, संसदेच्या आवारात दोन गोष्टींचीच चर्चा सर्वाधिक होती. पहिली, प्रियंका गांधी यांचा शपथविधी आणि दुसरी महाराष्ट्राचा 'मुख्यमंत्री'!

दिल्लीत थंडीची सुरुवात झाली असताना संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरू आहे. १८व्या लोकसभेचं तृतीय आणि पहिलं हिवाळी अधिवेशन होय. तर राज्यसभेचं २६६ वे अधिवेशन होय. अधिवेशनाचा पहिला आठवडा राजकीय घडामोडींनी गाजला. विरोधकांनी गोंधळ करून सरकारला नामोहरम करून सोडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अधिवेशनाचं कामकाज वारंवार तहकूब करावं लागलं.

थोडक्यात, संसदेच्या दोन्ही सभागृहात कोणतंही कामकाज होऊ शकलं नाही. अमेरिकेने उद्योगपती गौतम अदानी यांच्याविरूद्ध एफआयआर दाखल केल्यामुळे काँग्रेसच्या हातात सरकारच्या विरोधात आयते कोलीत मिळाले. काँग्रेसने त्याचा उपयोगसुद्धा केला. सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात होताच काँग्रेसचे खासदार गोंधळ घालत होते. हा प्रकार आठवडाभर सुरू होता.

याशिवाय, महाराष्ट्राच्या निकालानंतर महायुतीतील तिन्ही पक्षांचे गुरुवारी प्रथमच दिल्लीला आले होते. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप नेते देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्यासाठी दिल्लीत आले होते. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात काहीही कामकाज झालं नसलं तरी हे अधिवेशन इतिहासात दीर्घकाळापर्यंत स्मरणात राहणार आहे. याचं सर्वात मोठं कारण म्हणजे काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची लेक आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची बहीण प्रियंका गांधी यांचा लोकसभेच्या खासदार म्हणून झालेला शपथविधी.

प्रियंका गांधी या केरळची पारंपरिक साडी परिधान करून शपथ घेण्यासाठी आल्या होत्या. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासारख्या दिसत होत्या. अर्थात नात अगदी हुबेहुब आजीसारख्या दिसत होत्या. राहुल गांधी यांनी फोटोग्राफरची भूमिका बजावली. याशिवाय, संसदेच्या आवारात आणखी एका विषयाची सर्वाधिक चर्चा आहे आणि ती म्हणजे महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींची. दिल्लीच्या थंडीतही या घडामोडींनी संसदेतील तापमान वाढविले आहे, असे म्हणायला हरकत नाही.

नवीन संसद आणि संविधान सदन (जुनी संसद) या दोन्ही इमारतीच्या मधे थोडी मोकळी जागा आहे. येथेच मकर द्वार आहे. लोकप्रतिनिधींसाठी संसदेत प्रवेश करण्याचे हे मुख्य द्वार. केंद्रीय मंत्री, लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार, प्रिंट आणि वृत्तवाहिनींचे पत्रकार, येणारे जाणारे या सर्वांचे भेटण्याचे ठिकाण म्हणजे ही मोकळी जागा.

संसदेच्या परिसरात चार–पाच मोठ्या इमारती आहेत. यात नवीन संसद भवन, संविधान सदन, संसदेची विस्तारित इमारत आणि लायब्ररी बिल्डिंग याचा प्रामुख्याने समावेश होतो. या इमारतींमध्ये जवळपास पाच–सहा कँटीन आहे. याशिवाय, खासदारांसाठी नवीन संसदेत तळ मजला आणि पहिल्या माळ्यावर प्रत्येकी एक कँटीन आहे. याशिवाय दोन लायब्ररी आहेत.

या सर्व वास्तूंचा येथे उल्लेख करण्याचं कारण आहे या सर्व ठिकाणी येणारे–जाणारे, कँटीनमध्ये जेवायला येणारे कर्मचारी आणि सामान्य नागरिकांच्या तोंडातून दिवसातून कितीतरी वेळा एकच प्रश्न निघायचा तो म्हणजे 'महाराष्ट्र मे किसको बना रहें हैं मुख्यमंत्री'. महाराष्ट्राचं मुख्यमंत्रिपद म्हणजे लोकांचा उत्सुकता आणि टाइमपासचा महत्त्वाचा विषय! यात गुरुवारी महाराष्ट्रातील आणखी एका विषयाची भर पडली ती अजित पवार यांची. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या चेहर्यावरील स्मितहास्याने राजकीय विश्लेषकांचे काम खूप सोपे केले. याशिवाय, गंभीर आणि क्षणात सोक्षमोक्ष लावणारा नेता अशी अजितदादांची दिल्लीत प्रतिमा होती. ती या स्मितहास्यामुळे पुसली गेली.

राकाँ कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी रकाबगंज रोडवरील २६ नंबरच्या बंगल्यात गुरुवारी पत्रकारांना हात धुण्यासाठी बोलाविले होते. या ठिकाणी अजित पवारपण होते. गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी अजित पवार सकाळी साडेदहा वाजताच दिल्लीत दाखल झाले होते. यावेळी लोकसभेचे खासदार सुनील तटकरे आणि राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार उपस्थित होते.

शहा यांची भेट रात्री होणार होती. अशात, पूर्ण दिवस हाताशी असल्यामुळे पटेल यांनी पत्रकारांना बोलाविले. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि अन्य भाषांतील जवळपास १०० ते १५० पत्रकार जमले होते. अजित पवार पत्रकारांच्या एका गटासोबत गप्पा करीत होते. प्रफुल्ल पटेल दुसर्या गटासोबत चर्चा करीत होते. तटकरे काही पत्रकारांशी बोलत होते, तर सुनेत्रा पवार काही महिला पत्रकारांसोबत गप्पा–टप्पा करीत होत्या. चिरंजीव पार्थ पवार यांनीसुद्धा पत्रकारांच्या एका गटाशी चर्चा केली. अधूनमधून सर्वच नेते इकडे–तिकडे टेबलवर बसलेल्या पत्रकारांजवळ जाऊन 'सावकाश होऊ द्या' म्हणत गप्पा मारत होते. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीच्या उगम स्थानापासून ते पुढील सरकार स्थापन करण्यापर्यंतच्या सर्व बारीक–बारीक गुप्त गोष्टींबाबत पत्रकार विचारणा करीत होते. मग यात दोन पक्षाचे चार पक्ष कसे झालेत यापासून सर्वच विषय आले.

दिल्लीतील सौम्य थंडी आणि दुपारचे ऊन अशा वातावरणात दादांचं कुटुंब आणि पत्रकार यांचा जो फड रंगला तो कमालच! यात भर पडली ती दादांच्या स्मितहास्याची. 'दादा आपकी मुस्कुराहट का राज क्या हैं?' असा प्रश्न जवळपास प्रत्येक पत्रकारांना पडला आणि काहींनी तर दादांना चक्क विचारलं.

# अपघातात गंभीर जखमी झालेले नाव्होली येथील सुदाम बिक्कड यांचे उपचारादरम्यान अखेर निधन

केज/प्रतिनिधी अध्यात्मिक आणि धार्मिक, सांप्रदायिक कार्यात सतत अग्रेसर असणारे नाव्होली येथील सुदाम गोवर्धन (महाराज) बिक्कड यांच्या तिनचाकी स्कुटीचा चिंचोली माळी जवळ बुधवार रोजी अपघात झाला होता. या अपघातात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ येथे भरती करण्यात होते.त्यांचेवर उपचार सुरू असताना दि.२७ नोहेंबर शणिवार रोजी सुदाम बिक्कड यांचे उपचारादरम्यान अखेर निधन झाले. या बाबत अधिक माहिति अशी की, केज तालुक्यातील नाव्होली येथील रहिवासी श्री.सुदाम गोवर्धन बिक्कड वय वर्षे ७० हे गेल्या अनेक दिवसांपासून दोन्ही पाय कमजोर झाल्याने त्यांना पायांनी चालता येत नव्हते. ते गावापासून काही अंतरावर शेतात राहातं असल्याने त्यांना गावात येण्या जाण्यासाठी त्यांच्या मुलांनी त्यांना तिन चाकी स्कुटी घेवुन दिली होती. सुदाम महाराज बिक्कड यांना धार्मिक आणि आध्यात्मिक कार्याची आवड असल्याने ते सतत याच कार्यात मग्न असायचे त्यामुळे ते गावातील धार्मिक कार्यक्रमाठी पुढे येवुन अभंग, हरिपाठ, काकडा असे स्वतः गायन करत असत त्यामुळे त्यांना आसपासच्या गावांतून कार्यक्रमासाठी पाचारण केले जात होते. ते ज्ञानेश्वर माऊली उत्तरेश्र्वर पिंपरी यांच्या सहवासात राहून या धार्मिक क्षेत्रात आले होते. ज्ञानेश्वर माऊली यांच्या नंतर सद्या ते ह.भ.प.नारायण महाराज यांच्या जवळ सतत असायचे दि.२७ नोहेंबर २०२४ बुधवार रोजी ते काही कामा निमित्त केज येथे गेले होते. सायंकाळी अंदाजे ५ ते ५:३० वाजण्याच्या सुमारास ते केजहुन गावाकडे नाव्होली येथे परत येत असताना केज नांदुरघाट रस्त्यावरील चिंचोली माळी पासुन जवळ असलेल्या कृष्ण मंदिराजवळ त्यांच्या स्कुटीला अपघात झाला. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होवुन ते जखमी झाले होते. हा अपघात नेमका कसा झाला हे मात्र अद्याप पर्यंत समजले नाही. या घटनेची माहिती स्थानिक नागरिकांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन या घटनेची माहिती १०८ वरुन डॉक्टरांना दिल्याने केज उपजिल्हा रुग्णालयातील कर्तव्यावर असलेले डॉ सचिन सुर्यवंशी आणि चालक उमेश हांगे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्यांना केज उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणी त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ येथे भरती करण्यात आले.या ठिकाणी त्यांचेवर दि.३० तारखेपर्यंत उपचार सुरू होते. परंतु त्यांच्या डोक्याला गंभीर ईजा झाल्याने त्यांनी या उपचाराला प्रतिसाद दिला नाही. अखेर सुदाम गोवर्धन (महाराज) बिक्कड यांची दि. ३० नोहेंबर २०२४ शणिवार रोजी संध्याकाळी उपचारादरम्यान निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या गावी नाव्होली येथे त्यांच्या शेतात दि.१ डिसेंबर २०२४ रविवार रोजी दुपारी ३:०० वा.शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. तर दि.२ डिसेंबर सोमवार रोजी त्यांच्या रक्षा सावरण्याचा कार्यक्रम करण्यात आला. त्यामुळे त्यांच्या दहाव्याचा कार्यक्रम दि. ९ डिसेंबर २०२४ सोमवार रोजी पंढरपूर या ठिकाणी ठेवण्यात आला आहे. सुदाम गोवर्धन (महाराज) बिक्कड यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तिन मुली,भाऊ,तिन पुतने, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांना सुदाम देव या नावाने ओळखले जात होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ असल्याने सर्वांसोबत मिळुन मिसळुन राहात असायचे सुदाम महाराज बिक्कड यांच्या निधनामुळे गावात आणि परिसरात तसेच धार्मिक, सांप्रदायिक परिवारातून हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात दैनिक लोकनायक परिवार सहभागी आहे.

## नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा आज समारोप

लातूर : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूर आणि दयानंद कला महाविद्यालय ( नाट्यशास्त्र विभाग ) लातूरच्या वतीने लातूरच्या दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेचा सांरोप आणि पारितोषिक वितरण समारंभ बुधवार, दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता होणार आहे.

ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे यांच्या हस्ते स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पार पडणार आहे. यावेळी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक एकांकिका स्पर्धे चे हे पहिलेच वर्ष आहे. पहिल्याच स्पर्धेत महाराष्ट्रासह शेजारच्या हैदराबादच्या नाट्य संस्थेनेही यामध्ये आपला सहभाग नोंदवून उत्कृष्ट कलाविष्काराचे प्रदर्शन केले आहे. एकांकिका स्पर्धेतील सर्वच्या सर्व एकांकिकांना नाट्य रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या एकांकिका स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी स्पर्धेचे निमंत्रक विक्रांत गोजमगुंडे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे लातूर जिल्हा अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर ( बाबा ), प्रमुख कार्यवाह धनंजय बेंबडे, उपाध्यक्ष अजय गोजमगुंडे, निलेश सराफ,कोषाध्यक्ष अमोल नानजकर , संघटक उमाकांत हुरदुडे, अविष्कार गोजमगुंडे, अनिल कांबळे, कल्याण वाघमारे, डॉ.अशोक आरदवाड, बाळकृष्ण धायगुडे, प्रदीप भोकरे, संजय अयाचित, अपर्णा गोवंडे, सुरेखा मदने, डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, डॉ. मुकुंद भिसे, श्रुतिकांत ठाकूर, दीपरत्न निलंगेकर, एड. राणीताई स्वामी, सुधन्वा पत्की आदी मान्यवर परिश्रम घेत आहेत.

# राजकीय सत्ता हाती असली म्हणजे मनुष्य काय करू शकतो याचे मी उदाहरण सांगतो..! डॉ. बाबासाहेब आंबेडकर

दिनांक : ४ ऑक्टोबर १९४५ ला, दु. १२ वाजता पुणे येथील अहिल्याश्रमाच्या हॉल मध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन वर्किंग कमेटच्या बैठकीत, तसेच वऱ्हाड प्रांतिक शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची पहिली परिषद अकोला (महाराष्ट्र) य़ेथे तारीख ९ व १० डिसेंबर रोजी भरली होती. येथील टिळक मैदानावर १० डिसेंबर ला बाबासाहेब आपल्या अनयुयांना संबोधित करते वेळी. बाबासाहेब टिळक मैदानात जेव्हा मंचावर भाषण द्यायला उभे राहिले होते, तेव्हा अस्पृश्यांनी एकाच आवाजात गगनभेदी नारे लावले होते – आंबेडकर कौन है, दलितों का राजा है,शैड्युल्ड कास्ट फेडरेशनचा विजय असो, हरिजन नावाचा धिक्कार असो, आंबेडकर झिंदाबाद, थोडे दिन में भीमराज... बाबासाहेबांनी सर्वांना शांत केले, आणि आपल्या भाषणाला सुरुवात केली. पुणे (अहिल्याश्रम) – राजकीय सत्तेच्या जोरावर मनुष्य काय करू शकतो याचे एक चांगले उदाहरण आहे. मी हे माझा बडेजाव अगर गौरव करण्यासाठी सांगत नाही, तर आपल्या हाती राजकीय सत्ता आली तर आपण काय करू सकू हे दाखविण्यासाठी मी हे सांगत आहे. माझ्या जोडीला आणखी एखाद्या आपल्यापैकी मंत्री असता तर आम्ही दोघांनी पुष्कळच केले असते. मी जर प्रत्येक डिपार्टमेन्टमध्ये फक्त पाच पाच वर्षे राहिलो तर आपणास काही करता येणार नाही म्हणून आपण राजकीय सत्तेसाठी झगडले पाहिजे. झेश्रळींळली र्हिश्रव ींहश श्रळषश–लश्रेव`ष ींहश ङ्लहशर्वीश्रशव उरींेशी. आपला जो नाश झाला आहे. आपण आज हजारों वर्षे खितपत पडलो आहो त्याचे कारण आपणास राजकीय सत्ता नव्हती. ही सत्ता आपण मिळविलि पाहिजे. राजकीय सत्ता ही एक अजब शक्ती आहे, तिचा उपयोग आपण आपल्या शत्रुवर केला पाहिजे. अकोला (टिळक मैदान) – राजकीय सत्ता हाती असली म्हणजे मनुष्य काय करू शकतो याचे मी उदाहरण सांगतो. मी व्हाइसरॉयच्या ज्या कार्यकारी मंडळात प्रवेश केला त्या मंडळाचे १५ सभासद आहेत. मी तेथे एकटाच आहे. या गोष्टीला अडीच वर्षांवर कालावधी लोटला आहे. तेवढ्या अवधीत मी तिथे राहून काय केले हे सांगितले म्हणजे उलगडा होईल. मी तेथे जाण्यापूर्वी मध्यवर्ती सरकारने अस्पृश्यंच्या शिक्षणाची कसलीही जवाबदारी स्वतःच्या अंगावर घेतली नव्हती. मात्र मुसलमानांच्या अलिगड विश्वविद्यालयाला २० लाख रुपयांची मदत देऊन व बनारस हिंदू विश्वविद्यालयाला १९ लाख भांडवल पुरवून सहाय्य केले आहे. शिवाय या दोन्हीही संस्थांना सालिना ३ लाखाची मदत चालूच आहे. मी तेथे गेल्यानंतर सरकारने अस्पृश्यांकरिता ३ लाख रुपयांची मदत चालू केली आहे. शिवाय ३०० कॉलेज–शिष्यवृत्त्या, प्रत्येकी ६० रुपयांच्या, मंजूर झालेल्या आहेत. विद्यार्थ्यांना जर मदत द्यावयाची तर ती भरपूर द्यावयाची असे धोरण आखले आहे. याचवर्षी ३० विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी विलायतेस जातील. तुलना करा हे कार्य गांधीने वा काँग्रेसने केले नाही.




त्याचप्रमाणे दरवर्षाला १५ विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ शकतील. आपल्या पैकी असा कोणी विलायतेला गेला आहे का. आता अशी व्यवस्था केली आहे की, निदान २ वर्षात १५ विद्यार्थी विलायतेला येथून जातील. याप्रकारची पूर्वी कधीही नसलेली ही व्यवस्था आज झाली आहे. आता नोकरी संबंधी पहा. प्रॉव्हीन्शियल सर्व्हिसेसमध्ये आणि सेन्ट्रल सर्व्हिसेसमध्ये मुसलामांना शेकडा २५, ख्रिश्चनांना शेकडा साडेआठ, पण आपल्याला मात्र अशा प्रकारचे प्रमाण पूर्वी अजिबात नव्हते. फक्त यांचेकडे लक्ष पुरवावे एवढीच शिफारस होती. पण नुकतीच माझी मागणी सरकारला पटून आमचेही नोकऱ्यात शेकडा आठ पूर्णांक एक तृतीयांश असे प्रमाण ठरविण्यात आले आहे. मी तेथे गेलो तेव्हा माझ्या खात्यात अस्पृश्यांचे हमालसुद्धा नव्हते. मी गेल्यापासून आपले पुष्कळ लोक मोठ्या हुद्यावर चढले आहेत. आपल्यापैकी एक डेप्युटी सेक्रेटरी टू दी गवरनमेंट ऑफ इंडिया आहे. दुसरा एक अन्डर सेक्रेटरी आहे. तीन एक्झिक्यूटीव्ह इंजिनिअर आहेत. सिमल्याला माझा डिपार्टमेंटचा एक भाग आहे, तेथे एकंदर २८ क्लार्क आहेत. त्यापैकी १८ भंगी आहेत. आता डेप्युटी सेक्रेटरीज २, अंडर सेक्रेटरी व १ व एक्झिक्युटीव्ह इंजिनियर्स ३ असे अस्पृश्य वर्गाचे लोक भरले आहेत. कोणी म्हणतात की, मी महारांचेच हित करतो. मी महारज जाती जन्मलो याला मी काय करू. पण माझ्याविरुद्ध केली जाणारी ही तक्रार खोटी आहे. माझ्याच खात्यात सिमल्याला २८ क्लार्क पैकी १८ भंगी आहेत. विलायतेला जाणाऱ्या लोकात १ मांग, १ भंगी व चांभार पुष्कळ आहेत. मी आणखी एक गोष्ट यातच सांगू इच्छितो. एक मळकट असा भंगी अस्पृश्यांचा उमेदवार जेव्हा मुलाखती करता सिमल्याला आला तेव्हा त्याला खात्रीने नकार मिळेल हे जेव्हा मला समजले तेव्हा बोर्डावर मी माझे वजन आणून त्याला निवडणून घेतले. आता तो उमेदवार परदेशात आहे. मी स्वतःची आत्मप्रौढी करतो असे मात्र समजू नका. सांगण्याचा हेतू हाच की, राजकीय सत्ता हाती असता मनुष्य काय करू शकतो आणि म्हणूनच अस्पृश्य समाजाला इज्जत व माणुसकीसाठी राजकारण काबीज करायला पाहिजे. म्हणजेच फेडरेशनच्या प्रतिनिधिंना कायदेमंडळात जाऊन आमच्यावरील जुलुमाविरुद्ध आवाज काढता आला पाहिजे. एक व्हा रे नेक व्हा रे दुर नाही दिल्ली वंचित – बहुजनांनो हातात घ्यारे सत्तेची किल्ली..!

# लांबलचक–दाट अन् सुंदर काळ्या केसांसाठी आपल्या हेअर केअर रुटीनमध्ये या ६ नैसर्गिक गोष्टींचा समावेश करा

सुंदर, काळे, लांब आणि दाट केसांचे स्वप्न प्रत्येकजण पाहत असतो, परंतु अनेक कारणांमुळे केस लवकर लांब होत नाहीत किंवा गळू लागतात, त्यामुळे केस पातळ होतात. अनेकदा केसांमध्ये होणारे हे बदल वातावरणाच्या बदलामुळेही घडू शकतात. यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास कमी होऊ लागतो, तुम्ही स्त्री असाल किंवा पुरुष, केसगळतीची समस्या सर्वांनाच भेडसावते. त्यामुळे केसांना मुळांपासून मजबूत करण्यासाठी काही नैसर्गिक उपायांचा अवलंब करणे हा एक चांगला मार्ग ठरू शकतो. काही नैसर्गिक गोष्टी आहेत ज्यामुळे केस लांब आणि दाट होण्यास मदत होते.

आज आम्ही तुम्हाला अशा काही नैसर्गिक गोष्टींविषयी सांगत आहोत, ज्यांचा वापर तुम्ही आपल्या हेअर केअर रुटीनमध्ये करताच तुमच्या केसांचे आरोग्य आणि वाढ सुधारेल. यामध्ये कोणतेही हानिकारक रसायन नसल्यामुळे केसांना कोणतेही नुकसान होत नाही. त्यांच्या नियमित वापराने केसांची लांबी वाढते. याशिवाय केसही मजबूत होतात.

रोजमेरी ऑइल

रोझमेरी तेल केसांचे आरोग्य सुधारण्यास आणि केस गळणे कमी करण्यास मदत करते. नारळ किंवा जोजोबा तेलात मिसळून तुम्ही याचा वापर करू शकता. या तेलाने टाळूवर मालिश करा. आठवड्यातून २–३ वेळा या तेलाचा वापर केल्याने तुम्हाला नक्कीच याचा तुमच्या केसांवर सकारात्मक परिणाम दिसू लागेल. तुम्ही रोजमेरी चहा थंड करून केसांवर स्प्रे देखील करू शकता. त्यामुळे केस लवकर वाढतात आणि नवीन केसही वाढतात. ब्राह्मी

'ब्राह्मी, ज्याला बाकोपा असेही म्हणतात, हे केस मजबूत करण्यास मदत करते. नारळाच्या तेलात ब्राह्मी पावडर मिसळा आणि टाळूला मसाज करा. ३० मिनिटे राहू द्या आणि नंतर केस धुवा. त्यामुळे केस लवकर वाढतात आणि दाटही होतात. हिबिस्कस

हिबिस्कसची फुले किंवा याच्या पानांची पेस्ट केसांच्या वाढीस प्रोत्साहन देते. हिबिस्कसची फुले आणि पाने बारीक करून पेस्ट बनवा आणि टाळूवर लावा. ३०–६० मिनिटांनंतर, सौम्य शैम्पूने केस धुवा. याचा तुमच्या केसांवर प्रभावी परिणाम दिसून येईल.

आवळा आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट आढळतात, जे केसांच्या वाढीस प्रोत्साहन देतात. आवळा पावडर खोबरेल तेलात मिसळा आणि टाळूवर लावा आणि ३०–४० मिनिटांनी धुवा. त्याची पावडर पाण्यात विरघळवूनही तुम्ही तुमचे केस धुवू शकता.

शेवग्याची पाने

व्हिटॅमिन ए, सी आणि ई शेवग्याच्या पानांमध्ये आढळतात, जे केसांचे पोषण करतात. ड्रमस्टिकची पाने बारीक करून पेस्ट तयार करा आणि टाळूवर लावा. ३० मिनिटांनंतर आपली केस छान वॉश करा. जवस

जवसाच्या बियांमध्ये ओमेगा–३ फॅटी सिड आढळते, जे केसांची वाढ करण्यास मदत करते. जवसाच्या बिया भिजवून त्याची पेस्ट तयार करा आणि टाळूवर लावा. याशिवाय, तुम्ही एका दिवसाच्या अंतराने थेट टाळूवर जवसाचे तेल लावू शकता. हे केसांना हायड्रेट करते आणि त्यांच्या वाढीस प्रोत्साहन देते. त्यांचा नियमित वापर केल्याने तुमच्या केसांचे आरोग्य सुधारते, ज्यामुळे केसांची वाढ वाढते आणि ते मुळांपासून मजबूत आणि चमकदार बनतात.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही.

# 'हा' संसर्ग झाल्यास डोळ्यांतून वाहते रक्त! आतापर्यंत १५ जणांचा मृत्यू, पाहा लक्षणे आणि उपचार

काही वर्षांआधी भारतासह जगभरातील सर्वच देशांमध्ये कोरोना विषाणूने हाहाकार माजवला होतो. या विषाणूची लागण झाल्यामुळे अनेकांना आपला जीव देखील गमवावा लागला होता. मात्र अजूनही कोरोना विषाणू संपण्याचे नाव घेत नसल्यामुळे आरोग्य यंत्रणेच्या चिंतेत वाढ झाली आहे. त्यानंतर आटा पुन्हा एकदा नवीन विषाणूचा प्रसार होत आहे. आफ्रिकन देश रवांडामध्ये मारबर्ग व्हायरसने कहर केला असून आत्तापर्यंत यामध्ये १५ लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच अनेक लोकांना या गंभीर विषाणूची लागण झाली आहे. त्यामुळे या विषाणूचा वाढता धोका पाहून १७ देशांमधील प्रवाशांना अलर्ट राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. या विषाणूची लागण झाल्यानंतर काही गंभीर लक्षणे दिसून आली आहेत. त्यातील धक्कादायक बाब म्हणजे, या विषाणूची लागण झाल्यानंतर डोळ्यांमधून रक्तस्त्राव होण्यास सुरुवात होते. याला ब्लीडिंग आय व्हायरस असे देखील म्हणतात.

लाईफस्टाईल संबंधित बातम्यांसाठी इथे क्लिक करा

जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या अहवालानुसार, मारबर्ग विषाणू इबोला विषाणू कुटुंबाशी संबंधित आहे, ज्यामुळे व्हायरल हेमोरेजिक ताप येतो. शिवाय यामुळे रक्तवाहिन्यांना हानी पोहचण्याची शक्यता असते. रक्तवाहिन्यांमधून अंतर्गत रक्तस्त्राव होऊ लागल्यामुळे स्थिती आणखीन गंभीर होण्याची शक्यता असते. मारबर्ग विषाणू एक झुनोटिक विषाणू आहे, जो प्राण्यांपासून मानवाच्या शरीरात प्रवेश करतो. हा विषाणू केवळ वटवाघुळांमध्येच नाहीतर प्राण्यांच्या रक्त, मूत्र किंवा लाळेच्या संपर्कात आल्यामुळे मानवामध्ये पसरण्याची शक्यता असते. हा गंभीर विषाणूमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

मारबर्ग व्हायरसची लक्षणे:

खूप जास्त ताप येणे
सतत डोकं दुखणे
स्नायू दुखणे
घसा खवखवणे
उलट्या
पुरळ उठणे
जुलाब, इत्यादी गंभीर लक्षणे जाणवू लागतात. या संसर्गाची शरीरात वाढ झाल्यानंतर मृत्यू होण्याची शक्यता असते. तसेच अचानक वजन कमी होणे, नाक, डोळे, तोंड किंवा योनीतून रक्त येणे आणि मानसिक गोंधळ उडणे इत्यादी अनेक समस्या जाणवू लागतात.

मारबर्ग विषाणूवर उपचार:

तज्ज्ञांनी सांगितल्यानुसार, या विषाणूंवर अजूनही कोणते उपचार किंवा लस नाही. त्यामुळे ज्या लोकांना या विषाणूची लागण झाली आहे त्यांना लक्षणांच्या आधाराने उपचार केले जात आहेत. मारबर्ग विषाणूवर रक्त उत्पादने, रोगप्रतिकारक थेरपी आणि काही औषधांसह उपचार केले जात आहेत. शिवाय या विषाणूंवर प्राथमिक टप्प्यात लस तयार केली जात आहे. या गंभीर विषाणूची लागण झाल्यानंतर आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. त्यामुळे आरोग्याची योग्य ती काळजी घ्यावी. मारबर्ग विषाणूची लागण झालेल्या भागात जाऊ नका. शिवाय हा आजार पसरवू नये म्हणून सामाजिक अंतर, मास्क वापरणे आणि वारंवार हात धुणे इत्यादी गोष्टी फॉलो करणे आवश्यक आहे.

# जिल्हास्तरीय सीताफळ महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद



लातूर, दि. ०३ : जिल्हा कृषि विभागाच्यावतीने जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित सीताफळ महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील दहाही तालुक्यातील सीताफळ उत्पादक शेतकरी या महोत्सवात सहभागी झाले होते. रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, उपविभागीय कृषि अधिकारी महेश क्षीरसागर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

सीताफळ महोत्सवात विविध प्रजातीची सिताफळे शेतकऱ्यांमार्फत विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. सीताफळ उत्पादक शेतकरी व ग्राहकांनी या महोत्सवाला उपस्थिती लावली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचा कृषि विभागाचा प्रयत्न आहे. सीताफळ महोत्सवासारख्या उपक्रमातून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या फलोत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होईल. पुढील वर्षीही अधिक व्यापक स्वरुपात सीताफळ महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. जाधव यांनी सांगितले.

सीताफळासोबतच जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले पेरू, पपई, चिंच, अंजीर आदी फळांचे स्टॉलही याठिकाणी लावण्यात आले होते. नागरिकांनी या स्टॉलला भेटी देत फळांची खरेदी केली.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात !

लातूर, दि. ०३ : दिव्यांग बांधवांच्या कल्याणसाठी शासन, प्रशासन प्रयत्नशील आहे. जिल्ह्यातील दिव्यांग जणांच्या विकासासाठी जिल्हा प्रशासनाने आतापर्यंत विविध उपक्रम राबविले असून यापुढेही अशा उपक्रमांसाठी जिल्हा प्रशासन सदैव पुढाकार घेईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र आणि जिल्ह्यातील विशेष शाळा, कार्यशाळा व मतिमंद बालगृह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या केंद्रीय सल्लागार समितीचे सदस्य सुरेश पाटील, महिला व बाल विकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, समाज कल्याण अधिकारी विलास केंद्रे, संवेदना प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, कार्यवाह डॉ. योगेश निटूरकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. दिव्यांग मुलांवर विविध उपचार करून त्यांच्यातील दिव्यांगत्व कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग आणि सिद्धिविनायक प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आलेल्या उमंग ऑटिझम अँड मल्टीडीसिबिलिटी रिसर्च सेंटरला राष्ट्रीय स्तरावरील 'स्कॉच अवॉर्ड' नुकताच प्रदान करण्यात आला. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या उपक्रमाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली. इतर पुरस्कारांच्या तुलनेत या क्षेत्रातील कामाबद्दल मिळालेला पुरस्कार सर्वाधिक अभिमानास्पद असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे म्हणाल्या. संवेदना प्रकल्पाच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी करण्यात येत असलेल्या कामाचे त्यांनी यावेळी कौतुक केले. प्रारंभी जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. नाईकवाडी यांनी प्रास्ताविकात दिव्यांग बांधवांसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली. तसेच ८ हजार दिव्यांग बांधवांना १० लाख रुपयांचे साहित्य वितरीत करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यंकट लामजने यांनी केले, राजू गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालय व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रातील अधिकारी, कर्मचारी आणि जिल्ह्यातील विशेष शाळा, कार्यशाळा व मतिमंद बालगृहातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह बाळासाहेब वाकडे, बंकट पवार, सिंधू इंगळे, विजय बुरांडे यांनी परिश्रम घेतले. दिव्यांग क्षेत्रातील कामगिरीबद्दल पुरस्कार वितरण दिव्यांग क्षेत्रात कार्य करणारे उत्कृष्ट दिव्यांग व्यक्ती, अधिकारी व संस्था यांना यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आला. दीपक ओकारअप्पा क्षीरसागर यांना उत्कृष्ट दिव्यांग व्यक्ती, स्वआधार बेवारस मतिमंद मुलींची निवासी प्रकल्प यांना उत्कृष्ट संस्था, श्रीमती मनीषा बोरूळकर यांना प्रशासनातील उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी व डॉ. पद्मावती रमेश बियाणी यांना दिव्यांग मुलांचे उत्कृष्ट पालक पुरस्काराने गौरविण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक स्पर्धेत जिल्ह्यातील ४६ शाळांमधील २९७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

## शेत जमीन विक्री करण्यास इच्छुक शेतकऱ्यांना आपली जमीन शासनास विक्री करण्याची संधी

लातूर :- महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय १४ ऑगस्ट, २०१८ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील भूमिहीन व दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना ४ एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा २ एकर बागायती (ओलीताखालील) जमिन १०० टक्के अनुदानावर वाटप करण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यातील जमीन विक्री करण्यास इच्छुक असलेल्या शेतकऱ्यांकडून जमीन खरेदी करावयाची आहे. तरी जे शेतकरी आपली जमीन शासनास शासकीय (रेडीरेकनर) दराने विकण्यास तयार आहेत, अशा शेतकऱ्यांनी आपले अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, दुसरा मजला, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट समोर जुनी डालडा फॅक्टरी कंपाऊंड, लातूर यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त एस.एन. चिकुर्ते यांनी केले आहे.

जे शेतकरी शासनास जमीन विकण्यास इच्छुक आहेत, त्यांच्याकडे किमाना २ एकर बागायती अथवा ४ एकर जिरायती जमीन स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक आहे. कमाल जमीनीची अट नाही. ही जमीन निर्धोक व बोजारहित असावी. तसेच जमीनबाबत कोणत्याही न्यायालयात प्रकरण अथवा महसूल विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडे अपील प्रकरण चालू नसावे. जमीन बागायती असल्यास पाण्याची काय सोय आहे व जमीन रस्त्यालगत आहे की, आतमध्ये आहे. आतमध्ये असल्यास जमीनकडे जाण्यास रस्ता अर्जात नमूद करावा. जे शेतकरी त्यांची जमीन शासकीय दराने म्हणजेच जिरायती रुपये ५ लाख व बागायती जमीन रुपये ८ लाख कमाल दर प्रति एकर दराने विकण्यास तयार आहेत त्यांची शेतजमीन शासन खरेदी केली जाईल.

एखादी जमीन एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावे असल्यास त्या सर्व व्यक्तींची संमती व स्वाक्षरी अर्जावर असणे आवश्यक आहे. जी जमीन खरेदी करावयाची आहे, ती खरेदी करण्यापूर्वी मोजणी करुनच खरेदीबाबत निर्णय घेण्यात येईल. या योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यास अर्ज करण्याची आवश्यकता नाही. ज्या गावात जमीन उपलब्ध झालेली आहे, त्या गावातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन शेतमजुरांची यादी मागवून शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

तरी लातूर जिल्ह्यातील इच्छुक असलेल्या शेतकऱ्यांनी अटी व शर्तीनुसार परिपूर्ण माहितीसह अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, दुसरा मजला, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट समोर जुनी डालडा फॅक्टरी कंपाऊंड, लातूर यांचेकडे सादर करावेत. अर्ज केला म्हणजे जमीन विक्री करावीच लागेल असे नाही. संबंधित शेतकऱ्यांची संमती असल्याशिवाय जमीन खरेदी केली जाणार नाही. तसेच अर्ज केलेल्या शेतकऱ्याची जमीन खरेदी करणे शासनावर बंधनकारक नाही , असे श्री. चिकुर्ते यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# प्रवीण बागड़े यांना माफसूचा उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार प्रदान



नागपुर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तर्फे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांमधुन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या संचालक, विस्तार व शिक्षण विभागातील कार्यरत वरिष्ठश्रेणी लघुलेखक/स्विय सहायक श्री प्रविण मोरेश्वर बागडे यांना २०२३-२४ या वर्षाकरीता 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार' रजत जयंती सभागृह, पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर येथे विद्यापीठ वर्धापन दिन निमीत्त आयोजित सोहळयात प्रदान करण्यात आला. तसेच यावेळी त्यांना पुरस्कारसह प्रमाणपत्र, शाल-श्रीफळ आणि मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार विद्यापीठ मुख्यालय अधिनस्त घटक महाविद्यालये/प्रक्षेत्रे/संस्थेमधील २०२३-२४ या वर्षाकरीता वर्ग १ व २ संवर्गातून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एक शिक्षकेत्तर अधिकारी, तसेच वर्ग ४ संवर्गातील कर्मचाऱ्यास पुरस्कार देऊन सम्मानित करण्यात आले. सदर पुरस्काराचे उद्दिष्ट म्हणजे विद्यापीठ तसेच विद्यापीठ अधिनस्त घटक महाविद्यालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याची नोंद घेणे, कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सेवा तत्परता व विद्यापीठाप्रती आत्मीयता वाढविणे, कर्मचाऱ्यांमध्ये उत्कृष्ट आणि असाधारण योगदान देण्याची भावना जोपासने व त्यांची कार्यक्षमता वाढविणे असे आहे.

श्री. बागड़े यांनी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील दूधबर्डी येथे २० हेक्टर शासकिय जमीन संपादित करून विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रासाठी शासन निर्णय काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. यापूर्वी त्यांना २०१७-१८ करिता उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कारआणि २०२३ मध्ये 'लम्पी योध्दा' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. ते महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांकडे स्वीय सहाय्यक म्हणुन कार्यरत होते. शासन आणि प्रशासनाच्या अनुभवासोबतच त्यांना समाजसेवा आणि साहित्याचीही आवड आहे. त्यांनी कोविड अंतर्गत अनेक रुग्णांची सेवा सुध्दा केली आहे. तसेच त्यांचे महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर २५० वर लेख तसेच १०० वर मुलाखती/स्तंभ सुध्दा प्रकाशित झाले आहेत.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. नितीन पाटील, जैवतंत्रज्ञान विद्यापीठ, हैद्राबादचे डॉ. नियाज अहमद, मुख्य वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपुरचे डॉ. जितेंद्र रामगांवकर, पशुविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक (संशोधन) डॉ. नितिन कुरकुरे, संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. अनिल भिकाने, अधिष्ठाता (निम्न शिक्षण) डॉ. सचिन बोंडे, डॉ. कुलसचिव श्रीमती मोना ठाकुर, नियंत्रक (वित्त व लेखा) श्रीमती मनीषा शेंडे, विद्यापीठ ग्रंथपाल श्री सुनील गावंडे, विद्यापीठ अभियंता श्री. आरिफ शेख, परीक्षा नियंत्रक डॉ. भूषण रामटेके, नागपुर पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ आरजु सोमकुवर, मत्स्य महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. मुकुंद आमले आदींच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेक स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश जावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपकुलसचिव (आस्थापना) डॉ अजय गावंडे यांनी मानले.

# कापसाच्या उत्पन्नापोटी शेतकऱ्यांना फटका लागवडीचा खर्चही निघेना, घर प्रपंच चालवावा कसा ?

बिकट परिस्थिती
खर्च जाता बाकी ७ हजार रुपये शेतकऱ्यांकडे उरतात, मग एकरी पदरात आलेल्या ७ हजार रुपयांत संपूर्ण कुटुंबाची गुजराण कशी करायची? असा प्रश्न शेतकयांपुढे उभा राहात आहे. कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची तर बिकट परिस्थिती आहे.
कापूस पिकापोटी लाव लागवडीसाठी येणारा एकरी
नांगरणे, कल्टीवेटर
डवरणे
बियाणे
खत
निंदणी
इतर खर्च
कापूस वेचणी
एकूण खर्च
३००० रुपये
५ हजार
२ हजार
६ हजार
४ हजार
३ हजार
६ हजार
३५ हजार रुपये

किनवट/शेख शौकत :-पांढरे सोने म्हणविल्या जाणाऱ्या कापूस या नगदी पिकाचा उतारा घटला आहे. त्यातच शेतकऱ्यांच्या घरात जसा कापूस आला तसा भावही कमी अशा परिस्थितीत लागवडीपोटी केलेला खर्च निघणार नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे खर्च अधिक उत्पन्न कमी? प्रति एकरी केलेला खर्च व आलेले उत्पन्न यात मोठी तफावत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती ही परवडणारी नसल्याचे शेतकरी बोलू लागले आहेत. एकरी खर्च जाता बाकी उरलेल्या पैशात वर्षभर गुजराण करावी कशी? पुन्हा बियाण्यांची जुळवा जुळव करावी कशी? घरप्रपंच चालवावा कसा? लेकी बाळींचे लग्न कसे करावे? असा प्रश्न तालुक्यातील शेतकरी उपस्थित करत आहेत. खरीप हंगाम २०२४-२५ या वर्षात कापूस या नगदी पिकाचे क्षेत्र २ लाख ७०९ एकर म्हणजे ५१ हजार ७७४ हेक्टर आहे. उन्हाळी उदीम नांगरणे, कल्टीवेटर, डवरणे, बी बियाणे, फवारणी, निंदण, रासायनिक खते इतर खर्च व कापूस वेचणी असा एकरी जवळपास ३५ हजार रुपयांचा खर्च येतो. तर उत्पन्न एकरी ६ क्विंटल आणि कापसाला भाव ७ हजार रुपये प्रति क्विंटल मिळाला तर ४२ हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. पांढरे सोने म्हणविल्या जाणाऱ्या कापसाला प्रति क्विंटल दहा ते बारा हजार रुपये भाव मिळाला तर शेतकऱ्यांना शेती परवडते. अन्यथा शेतकऱ्यांना शेती न परवडणारी झाली आहे. दरवर्षी निसर्गाचा प्रकोप शेतकऱ्यांच्या पाचविला पुंजला आहे. यातून तो सावरेल कसा? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांप्रती शासनाने योग्य धोरण राबवले तर शेतकरी कर्जाच्या खाईतून बाहेर येईल. उसनवारी, सवाई, दिडी दुपटी व्याज याच चक्रात शेतकरी अडकून पडले आहेत. या संकटातून बाहेर काढण्यासाठी राज्यकर्त्यांनी मदत करावी, अशी मागणी होत आहे.

# खा.बजरंग सोनवणे यांच्या विरोधात केज मधील पत्रकार एकवटले ! पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करणार !

गुन्हा दाखल करणार -पोलीस निरीक्षक महाजन
दरम्यान याबाबत केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांची पत्रकारांनी रात्री पोलीस ठाण्यात जाऊन भेट घेतली व रितसर तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी मी एस.पी.साहेबांशी चर्चा करून सकाळी गुन्हा दाखल करतो असे आश्वासन दिले.


पत्रकारांचे कुटुंब हादरले -
खा.बजरंग सोनवणे यांनी बीड येथील जाहीर कार्यक्रमात बोलताना केज येथील जेष्ठ पत्रकार, त्यांची पत्नी व मुलाबद्दल अनैतिक भाषेत, टीका टिप्पणी केली.यामुळे पत्रकारांचे कुटुंब पार हादरून गेले आहे.या प्रकरणी खा. बजरंग सोनवणे यांचे विरुद्ध पत्नीचा विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल करावा व कुटुंबाची मानहानी केल्याचा गुन्हा नोंद करावा या मागणीचे निवेदन पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना देण्यात आले.याप्रसंगी उपस्थित असलेले केज येथील सर्व मान्यवर व जेष्ठ पत्रकार उपस्थित होते.

केज/ प्रतिनिधी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकारांबद्दल काढलेल्या वक्तव्याचा सर्वत्र निषेध व्यक्त होत असतानाच केज मधील पत्रकारांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.परिणामी खा.बजरंग सोनवणे यांच्या विरोधात केज मधील सर्व पत्रकार एकवटले असून खा.बजरंग सोनवणे यांचेवर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे.याबाबतकेज मधील विविध पत्रकार संघटनेचे पदाधिकारी व पत्रकारांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खा.बजरंग सोनवणे यांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत केज येथील दैनिक लोकमतचे तालुका प्रतिनिधी मधुकर सिरसट यांनी खा.बजरंग सोनवणे यांच्या विरोधात केज पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल केली आहे.खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकारांची बायको आणि मुलाचा उल्लेख करत जातीद्वेषातून व हेतुपुरस्पर जाहीर भाषणातून दडपशाहीची भाषा वापरून पत्रकारांना अपमानित केले आहे.याचा संपूर्ण राज्याभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. यामुळे बजरंग सोनवणे व त्यांच्या कार्यकर्ते यांचेकडून सदर पत्रकारांच्या जिवितास यामुळे धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे सदर पत्रकार व पत्रकारांचे कुटुंबिय प्रंचड मानसिक तणावाखाली असून मधुकर सिरसट व त्यांचे कुटुंबिय प्रंचड भेदरलेल्या अवस्थेत आहेत.त्यांमुळे केज येथील जेष्ठ पत्रकार मधुकर सिरसट यांना तात्काळ पोलीस संरक्षण देण्यात येऊन बजरंग सोनवणे यांच्यावर अँट्राँसिटी अँक्टसह पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यासाठी रितसर केज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.परिणामी खा.बजरंग सोनवणे यांच्या या वक्तव्यामुळे पत्रकारांचे कुटुंबिय प्रंचड मानसिक तणावाखाली असून पार भेदरलेल्या अवस्थेत सध्या आहेत. त्यामुळे त्यांना संरक्षण देण्यात यावे या मागणीसह खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रकारांची जाहीर माफी मागावी.यासह विविध मागण्याचे निवेदन उद्या दि.४ डिसेंबर२०२४ रोजी बुधवारी सकाळी११:००वाजता केज तहसीलदारांना देण्यात येणार आहे. यावेळी सर्व संघटनांचे पत्रकार काळ्या फिती लाऊन तहसील कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करणार आहेत.तरी केज मधील सर्व पत्रकारांनी तसेच विविध पत्रकार संघटनेचे पदाधिकारी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून



# झोपलेल्या वनविभागामुळे माहूरात बिबट्यांचा धुमाकुळ; माहूर शहरासह तालुक्यातील अनेक गावात बिबट्याच्या दर्शनाने दह

बिबट्याच्या धुमाकूळ मुळे शहर व अनेक गावावर भीतीचे वातावरणा सामान्य जनतेचे जीवाला धोका असल्यास दिसून येत आहे. शेत शिवारात बिबट्याच्या भय दिसून येत असल्यांने सामान्य जनतेची झोप उडाली आहे.माहूर वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांना अनेक वेळा संपर्क जोडल्यानंतर ही प्रतिसाद देत नाही म्हणून वनप्रेमी यांनी नाराजगी व्यक्त केले आहे. फोन वर अनेक वेळा बोलण्याचे प्रयत्न केले तरी वनविभागाचे अधिकारी बोलत नाही. दुर्घटनामुळे बिबट्याचे मृत्यू व अनेक घटना घडली वन्य जीवाची हानी झाल्याने वन्यप्रेमी चिंतेत आहे. वन्यजीव यांच्या संरक्षण व्हावे असे जनतेतून आवाज उठवले जात आहे. शहर शिवारात वन्यजीवांच्या संरक्षण करण्यासाठी प्रशासन गंभीरतेने पुढचं मार्ग काढावे अशी जनतेत चर्चा होत आहे.



किनवट/शेख शौकत :-परिसरात बिबट्याचा मुक्तसंचार शेतकऱ्यांसह नागरीकांत भितीचे वातावरण महिनाभराच्या जंगल सफारी नंतर माहूर शहरात बिबट्या अवतरला असून १ डिसेंबर रोजी पहाटे तहसील, वनपिक्षेत्र कार्यालय परिसरात बिबट्या मुक्तसंचार करीत असल्याचे दिसून आले. यावेळी प्रातः विधीसाठी घराबाहेर पडलेल्या नागरिकांची पाचावर धारण बसली. दरम्यान गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्या परिसरात फिरत असल्याने नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. महिन्याभराआधी माहूर शह- रासह तालुक्यात बिबट्या आपल्या जोडीदार आणि दोन पिल्लासह धुमाकूळ घालत होता. जंगली प्राण्यांसह मोकाट कुत्रे शेतात बांधलेली गुराढोरावर अनेक वेळा हल्ले करून ठार मारले. त्यामुळे माहूर शहरात मोठ्या प्रमाणात दहशत पसरली होती. यानंतर महिनाभरापासून शहरासह तालुक्यात बिबट्याचे दर्शन झाले नव्हते परंतु आता मोठा बिबट्या माहूर शहरातील तहसील, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय तसेच शेजारी असलेल्या जंगल आणि रस्त्याच्या आजूबाजूला बिबट्याला दिवसा फिरतांना अनेकांना दर्शन होत आहे. यात दि. १ डिसेंबर रोजी पहाटे तहसील कार्यालय परिसराला लागून असलेल्या जिनिंग प्रेसिंग च्या पडीक इमारतीच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत प्रातःविधीला गेलेल्या नागरिकांना बिबट्याचे अचानक दर्शन झाल्याने त्यांनी घराकडे धूम ठोकली. माहूरचे तहसील, वनपरिक्षेत्र अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय हे तिन्ही कार्यालय जंगलाला लागून आहेत. या तिन्ही कार्यालयांना संरक्षक भिंती नसल्याने मोकाट प्राणी, चोरटे येथे नेहमीच धुमाकूळ घालीत असतात त्यात वाघ आणि बिबट्या शहरात मुक्तसंचार करीत आहेत. जंगलात शिकार न मिळाल्यास तो माह- र शहरात येऊन मोकाट भटक्या कुत्र्यांची शिकार करीत आहे. या पुढे मनुष्यहाणी होऊ नये यासा- ठी तिन्ही कार्यालयांना तात्काळ संरक्षक भिंत बांधून मोकाट फिरत असलेल्या बिबट्यास जेरबंद करून लगतच्या पैनगंगा अभयारण्यात सोडावे अशी मागणी नागरिकातून होत आहे.

# पुनम कठारे यांना पीएचडी प्रदान



कंधार / प्रतिनिधी :- येथील श्री शिवाजी कॉलेजची विद्यार्थीनी पुनम कठारे यांना नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान केली आहे. पुनम कठारे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयात 'स्वातंत्र्य सैनिक रामराव पवार यांचे जीवन व कार्य एक ऐतिहासिक अभ्यास' या विषयावर लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.सदाशिव दंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शोधप्रबंध सादर केला होता. हा प्रबंध विद्यापीठाने स्विकारुन तिला पीएचडी पदवी प्रदान केली आहे.

पुनम कठारे यांनी एम.ए.इतिहास विषयात २०१६ मध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. त्यांचे आतापर्यंत ५ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. तर १२ शोधनिबंध इतिहास विषयात प्रकाशित आहेत. त्या प्रसिद्ध इतिहास संशोधक कै.डॉ.अनिल कठारे व कंधारपूर त्रैमासिकाच्या संपादिका रमाताई कठारे यांच्या जेष्ठ कन्या आहेत. वडिलांचा वारसा पुढे नेण्याची एक एक पायरी ते सर करीत आहेत.

या यशाबद्दल श्री शिवाजी कॉलेज कंधारचे अध्यक्ष प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, सचिव भाई गुरुनाथराव कुरुडे, सहसचिव अ‍ॅड.मुक्तेश्वर धोंडगे, प्राचार्य डॉ.सूर्यकांत जोगदंड, प्रा.डॉ.चित्राताई लुंगारे, डॉ.विजया साखरे, डॉ. दिलीप सावंत, डॉ.संजय गिरे, डॉ.गंगाधर तोगर, डॉ.सुभाष रगडे, डॉ.परीक्षित धोंडगे, प्रा.विकास परके, प्रा.गायकवाड, डॉ.संघपाल इंगळे, डॉ. वसंत कदम, डॉ.उज्वला सदावर्ते, डॉ.बाळासाहेब पवार, प्रशांत गायकवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुधाकर सोनकांबळे आदींसह अनेकांनी तिचे अभिनंदन केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE